Mahratta
Multi-Disciplinary Journal
ISSN No- 2581-9879 (Online), 0076-2571 (Print)
www.mahratta.org, editor@mahratta.org

# गणेशोत्सवाचे बदलते स्वरूप; प्रारंभ ते आजवरची स्थित्यंतरे

*रामदास नेहूलकर*
*सहाय्यक प्राध्यापक,*
*टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे*

## प्रस्तावना

भारतीय समाजात उत्सवांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. उत्सव म्हणजे केवळ धार्मिक विधी नाहीत, तर लोकांना एकत्र येण्याचे आनंद वाटून घेण्याचे आणि सामाजिक संवाद वाढवण्याचे ते एक माध्यम आहे. गणेशोत्सव हा त्यातील सर्वात लोकप्रिय व जनमानसात खोलवर रुजलेला उत्सव आहे. विघ्नहर्ता आणि मंगल करता म्हणून गणपतीची पूजा प्रत्येक घराघरातून होते; पण हा उत्सव फक्त धार्मिकतेपुरता मर्यादित न राहता सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि पर्यावरणीय स्वरूप धारण करत गेला. गणेशोत्सवाच्या या प्रवासात आपल्या अनेक स्थित्यंतरे दिसून येतात. प्राचीन काळातील घरगुती पुजेपासून पेशव्यांच्या राजाश्रयापर्यंत, लोकमान्य टिळकांच्या सार्वजनिक चळवळीपासून स्वातंत्र्योत्तर काळात समाज जागृतीपर्यंत आणि आजच्या काळातील तंत्रज्ञान प्रधान व्यापारी व पर्यावरणपूरक उपक्रमापर्यंतचा गणेशोत्सवाचा हा प्रवास अत्यंत रोचक आहे. या सर्व बदलांचा अभ्यास केला, तर गणेशोत्सव हा भारतीय समाजाचा सतत बदलणाऱ्या मानसिकतेचा आरसा आहे असे दिसते.

## गणेश उपासनेचा उगम

गणेश उपासनेचा उगम हा वेदकालीन ग्रंथात सापडतो. ऋग्वेदातील 'गणानाम गणपती हवामहे' या मंत्राद्वारे गणपतीला अग्रपूजक देवता मानले गेले आहे. पुराणकथेमध्ये गणेश हा पार्वतीचा पुत्र शिवाचा नंदन व बुद्धीचा अधिपती म्हणून वर्णिला आहे. मुद्गल व गणेश पुराणात गणेशाची विविध रूपे त्यांचे वैशिष्ट्ये व त्यांचा प्रभाव यांचे विस्तृत वर्णन आढळते. हळूहळू गणेश पूजा घराघरात सुरू झाली. प्रत्येक मंगलकार्यात गणेशाचे स्मरण अनिवार्य बनले. श्री गणेशाय नमः या मंगलाचरणाने कार्याची सुरुवात करण्याची परंपरा आजही चालू आहे. यावरून गणेश गणेश हा केवळ देवता नसून जीवनशैलीचा एक महत्त्वाचा भाग बनला होता, हे लक्षात येते.

## पेशव्यांचा काळ राजाश्रयातील गणेशोत्सव

अठराव्या शतकात पुणे हे पेशव्यांच्या राजधानीचे ठिकाण झाले. या काळात गणेशोत्सवाला वैभवशाली रूप लाभले. पुण्यातील कसबा गणपती, दगडूशेठ हलवाई गणपती यांसारख्या प्रतिष्ठित देवस्थानांचा उदय झाला. पेशवे व सरदार मंडळी गणेशोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करत वाड्यात संगीत नृत्य कीर्तन, पुराणवाचक असे कार्यक्रम होत असत. समाजातील उच्चभ्रू वर्ग या उत्सवात सहभागी होत असत; मात्र सामान्य लोकांचा सहभाग मर्यादित होता. या काळातील गणेशोत्सव हा धार्मिक व सांस्कृतिक होता; पण त्यास राजकीय किंवा सामाजिक चळवळीचा ठसा नव्हता. त्यामुळे हा उत्सव अद्याप सार्वजनिक स्वरूप धारण करू शकला नव्हता.

## लोकमान्य टिळक आणि सार्वजनिक गणेशोत्सव

1857 नंतर ब्रिटिशांनी भारतीय समाजावर कठोर बंधने आणली. मोठ्या राजकीय सभा, राजकीय आंदोलने यांना बंदी होती; मात्र धार्मिक उत्सवावर अशी कारवाई नव्हती, हाच मार्ग लोकमान्य टिळकांनी शोधला. 1893 मध्ये

## पुण्यात त्यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली.

पुण्यातील सार्वजनिक गणेशोत्सवाच्या परंपरेसंदर्भात केसरीचे माजी संपादक ज. सं. करंदीकर यांनी लिहिलेल्य गणेशोत्सवाची साठ वर्षे या ग्रंथात विस्ताराने वाचायला मिळते. आजच्या गणेशोत्सवाची मूळ कल्प स्पष्ट करताना त्यांनी म्हटले, की पुण्यात खाजगी रीतीने चालू असलेल्य उत्सवात कैलासवासी सरदार कृष्णाजी

काशिनाथ काशिनाथ उर्फ नानासाहेब खाजगीवाले यांनी विस्तारीत स्वरूप दिले. 1892 मध्ये ते ग्वाल्हेरला गेले असताना तिथे त्यांनी सार्वजनिक स्वरूपात पण दरबारी थाटाने गणेशोत्सव साजरा होत असलेला पाहिले. अशा प्रकारचा उत्सव पुण्यात साजरा का होऊ नये असे त्यांना वाटले. त्या उत्सवाची प्रेरणा घेऊन 1893 मध्ये खाजगीवाले, घोटावडेकर आणि भाऊ रंगारी अशा तीन सार्वजनिक गणपतीची प्रतिष्ठापना 1893 मध्ये करण्यात आली. प्रतिष्ठापनेची गणेशमूर्ती वाजत गाजत रस्त्याने मिरवत नेण्याची परंपरा त्यावर्षीपासून सुरू झाली. त्यानंतर हळूहळू गणपतीची संख्या वाढीस लागली. अशा रीतीने सुरू झालेल्या गणेशोत्सवाला अधिक व्यापक भव्य आणि सार्वजनिक स्वरूप देण्याचे श्रेय लोकमान्य टिळकांकडे जाते.
इंग्रजी शिक्षणामुळे हिंदूंचे आचार नष्ट होऊ नयेत, विचार भ्रष्ट होऊ नयेत, धर्माबद्दलची उदासीनता कमी होऊ नये, यासाठी गणपती उत्सव उपयुक्त ठरेल, असे त्यांना वाटले. त्यातून गणेशोत्सव दहा दिवसांचा करावा, त्यास प्रबोधनाची आणि ज्ञानसत्राची जोड द्यावी. त्यातून सामाजिक जागृती साधता येईल अशा कल्पनेतून या उत्सवात त्यांनी व्यापक स्वरूप दिले. या उपक्रमाची तीन प्रमुख उद्दिष्टे होती. राष्ट्रीय एकता निर्माण करणे, जात, धर्म, प्रांत यातील भेद विसरून लोक एकत्र यावेत. त्यातून राजकीय जागृती घडवणे, व्याख्याने, नाटके, कीर्तने यामधून संदेश स्वराज्याचा संदेश पसरवणे, सामाजिक सुधारण्याचे व्यासपीठ शिक्षण स्वदेशी उद्योग समाजातील कुप्रथा या विरुद्ध जनजागृती करणे, या उद्दिष्टांमधूनच गणेशोत्सव घराघरातून रस्त्यावर आला. पुण्यातील मंडळींनी आदर्श निर्माण केला आणि पुढे मुंबई, कोल्हापूर, सातारा, नागपूर, ठाणे अशा अनेक ठिकाणी गणेश मंडळांची स्थापना झाली. गणेशोत्सव जनतेच्या मनाशी जोडला गेला तो स्वातंत्र्यसंग्रामातील एक अप्रत्यक्ष शस्त्र ठरला.

## स्वातंत्र्योत्तर काळातील बदल

1947 मध्ये देश स्वतंत्र झाला, आता राजकीय उद्दिष्टे मागे पडली. तरीही गणेशोत्सव जनतेच्या जीवनाचा भाग राहिला. त्याची दिशा मात्र बदलत गेली. यातून
शैक्षणिक व बौद्धिक उपक्रम- त्यातून निबंध, वक्तृत्व स्पर्धा, वाचनालय व्याख्यानमाला असे उपक्रम सुरू झाले.
सामाजिक सुधारणा अंतर्गत -अस्पृश्यता निर्मूलन, महिला शिक्षण, व्यसनमुक्ती मोहिमा आदी उपक्रम घेण्यात येऊ लागले.
सांस्कृतिक कार्यक्रम अंतर्गत -संगीत मैफली, नाटके, लोककला स्पर्धा, क्रीडा उपक्रम असे विविध उपक्रम होऊ लागले.
ग्रामीण विकासाच्या बाबतीत -रस्ते बांधणी, स्वच्छता, पाणीपुरवठा यासाठी गणेश मंडळांचा उपयोग होऊ लागला. गणेशोत्सव यामुळे समाज जागृतीचे प्रभावी साधन ठरला; मात्र काही ठिकाणी स्थानिक राजकारण्यांनी त्याचा वापर सुरू केला. नगरसेवक, आमदार, लोकप्रतिनिधी यांच्या माध्यमातून ते आपली छाप सोडू लागले. त्यामुळे उत्सवात राजकीय हस्तक्षेप वाढू लागला.

## आधुनिक काळातील गणेशोत्सव

उत्सवाच्या प्रारंभीच्या काळात लोकमान्यांच्या नेतृत्वाची आणि शिकवणुकीची छाप स्पष्टपणे दिसून येते. गणेशोत्सवास मोठ्या प्रमाणात ज्ञानसत्राचे व स्वातंत्र्य चळवळीचे माध्यम म्हणून वापरण्याचे श्रेय लोकमान्य टिळकांनाच द्यावे लागते. लोकांच्या उत्सवप्रियतेचा फायदा घेऊन त्यास विधायक वळण लावून विस्कळीत समाजाला एकत्र आणण्याचा हेतु त्यांनी साध्य केला. नंतरच्या काळात मात्र या उत्सवाला धर्मनिष्ठता व जातीयवादाचा रंग चढू लागला. काळानुरुप या उत्सवात बदल होत गेले. आधुनिक तंत्रज्ञान, प्रकाशयोजना, नयनरम्य देखावे यामुळे हे उत्सव आणि विसर्जन मिरवणुका लक्ष्यवेधी ठरु लागल्या .
आजचा गणेशोत्सव भव्यता, आधुनिकता आणि व्यापारी स्वरूपामुळे वेगळाच दिसतो. त्यात भव्य मूर्ती आणि सजावट याला महत्त्व आले आहे. दहा-बारा फुटाच्या उंच मूर्ती, विविध धार्मिक, सामाजिक विषयावरील देखावे यामध्ये भव्यता आली आहे. विविध तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. ज्यामध्ये डिजिटल स्क्रीन लेझर शो, थ्रीडी प्रोडक्ट प्रोजेक्शन, समाज माध्यमावरील विविध संदेशांचे थेट प्रक्षेपण, कोणत्या मंडळाची सजावट मोठी, कोणती सजावट नाविन्यपूर्ण यावर अधिक लक्ष देऊ लागले, यात व्यावसायिकता आहे. प्रायोजित कंपन्या आल्या . त्यातून जाहिराती, बॅनर, होर्डिंग यांना महत्त्व आले. जागतिकीकरण यामुळे मुंबईतील लालबागचा राजा किंवा पुण्यातील

कसबा गणपती किंवा दगडूशेठ हलवाई गणपती यांसारख्या गणेश मंडळांना देश-विदेशातून लाखो भाविक भेट देत असतात.

## सरकारी मान्यता:

जुलै 2025 मध्ये, महाराष्ट्र सरकारने राज्य-निधी सांस्कृतिक कार्यक्रम आणि उपक्रमांद्वारे सामाजिक एकता, राष्ट्रवाद आणि सामुदायिक भावनांना प्रोत्साहन देण्यासाठी गणेशोत्सवाला राज्य उत्सव घोषित केले, त्यामागे व्यापक उद्देश आहे.
गणेशोत्सव हा महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख आहे. समाजातील प्रत्येक व्यक्ती गणेशोत्सवात सहभागी असतो. आता गणेशोत्सवप्रथमच राज्य शासन साजरा करत असल्याने हा उत्सव आता अधिक व्यापक प्रमाणात साजरा करून त्यात लोकसहभाग वाढवावा, हा यामागचा मुख्य उद्देश आहे.
गणेशोत्सव केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित न राहता 22 देशांमध्ये साजरा होतो. सार्वजनिक तसेच घरगुती पद्धतीने आणि आता राज्य शासनामार्फतही साजरा होणारा हा गणेशोत्सव सर्व धर्म, जात, भाषांना जोडणारा उत्सव असावा. या गणेशोत्सव काळात तालुका ते राज्य स्तरावरील विविध सांस्कृतिक स्पर्धांसाठी 10 कोटी रुपयांची बक्षीसे ठेवली गेली असून समाज माध्यमांवरून विशेष मोहीम राबवली जात आहे.
गणेशोत्सवाच्या निमित्ताने प्रत्येक विभागाने नाट्य, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करावेत. छत्रपती शिवाजी महाराज यांचे गड-किल्ले, ऑपरेशन सिंदूर, आत्मनिर्भर भारत, स्वदेशी संकल्पना असे विषय घेऊन कार्यक्रम राबविण्यात यावेत. घरगुती व सार्वजनिक गणेशोत्सवाचे फोटो-व्हिडिओ जगभरातून अपलोड करता यावेत, यासाठी विशेष प्लॅटफॉर्म तयार करण्यात येत असून यात प्रमुख मंडळांचे थेट प्रक्षेपण सुद्धा उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर चित्रपट महोत्सव, शैक्षणिक कार्यक्रम आदी विषयांवर निबंध, चित्रकला, ब्लॉग स्पर्धा आयोजित करण्यात याव्यात, अशा सूचनाही शासनाने दिल्या आहेत.
गणेशोत्सवाला राज्य महोत्सव दर्जा मिळाल्याने महाराष्ट्राची सांस्कृतिक ओळख अधिक घट्ट होणार आहे. लोकसहभाग, डिजिटल प्रसार, आंतरराष्ट्रीय पातळीवरील मान्यता आणि पर्यावरणपूरक उपक्रम यामुळे हा उत्सव केवळ धार्मिक न राहता जगाला एकत्र आणणारा सांस्कृतिक सोहळा ठरणार आहे.
शासन निर्णयानुसार तालुका स्तरापासून राज्य स्तरावर विविध गणेशोत्सव मंडळ जे धार्मिक प्रथा परंपरानुसार सहभागाने पर्यावरणपूरक आणि सामाजिक उपक्रमात काम करणाऱ्या गणेशोत्सव मंडळांना पारितोषिकाची घोषणा केली आहे. गणेशोत्सव काळामध्ये भजनी मंडळांना भजनामधील साहित्यासाठी थेट लाखो रुपयांचे अनुदान देण्याची योजना घोषित झाली आहे. परदेशातही गणरायाचे आगमन धुमधडाक्यात व्हावे, म्हणून हा राज्य महोत्सव मोठ्या प्रमाणात साजरा व्हावा, ही भूमिका घेण्यात आली आहे.

## काटेकोर विसर्जन-मार्गदर्शक तत्त्वे:

पीओपी मूर्तींसाठी नियम लागू केले जात आहेत, ज्यामध्ये मूर्ती बनवणाऱ्या आणि विक्रेत्यांची अनिवार्य नोंदणी आणि कृत्रिम तलावांमध्ये विसर्जनासाठी सोप्या ओळखीसाठी पीओपी मूर्ती चिन्हांकित करण्याची आवश्यकता समाविष्ट आहे.

## स्थानिक कारागिरांना प्रोत्साहन:

स्थानिक कारागिरांना शाडू माती आणि स्टॉल्ससारख्या संसाधनांसह पाठिंबा दिला जात आहे, ज्यामुळे पर्यावरणपूरक मूर्ती अधिक सुलभ होतात आणि उत्पादन खर्च कमी होईल.
उत्सवाच्या केंद्रस्थानी असलेल्या कार्यकर्त्यांचा व्यक्तीमत्त्व विकास याच व्यासपीठाने घडवला आहे. आपत्कालीन व्यवस्थापन आणि नियोजनाचे धडे गिरवण्याची संधी या कार्यकर्त्यांना या उत्सवाच्या नियोजनातून मिळते. काही काळ हा उत्सव लोकवर्गणीच्या आधारातून सुरु राहिला. नंतरच्या काळात तो श्रीमंतांच्या आणि राजकीय नेत्यांच्या हाती गेला. लाखो-करोडोंच्या घरात या उत्सवाची उलाढाल होऊ लागली. सार्वजनिक गणेशोत्सव हे प्रचार आणि प्रसाराचे एक माध्यम म्हणून वापरले जाऊ लागले.

## बदलत्या स्वरूपाचे सकारात्मक परिणाम

सामाजिक उपक्रम यात रक्तदान, मोफत आरोग्य शिबिरे, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना साहित्य वाटप असे उपक्रम या उत्सवाच्या माध्यमातून होऊ लागले. महिलांचा सहभाग वाढला. महिला मंडळी महिलांची ढोल-ताशा पथके या उत्सवात सहभागी होऊ लागली. या उत्सवात तरुण मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊ लागले. त्यातून पर्यावरणपूरक मूर्ती, स्वच्छता मोहिमा यांसारखे उपक्रम हाती घेण्यात येऊ लागले. परंपरांचे जतन होऊ लागले, ज्यामध्ये आरती, भजन, ढोल-ताशा विसर्जन सोहळा यांसारखे उपक्रम होऊ लागले. सामूहिक एकात्मता साधण्याचे एक ते साधन बनले. शहर आणि गावातील समाजातील सर्व घटक या उत्सवाच्या निमित्ताने एकत्र येऊन हा उत्सव साजरा करतात. त्यामधील एकमेकांतील मतभेद दूर करण्याच्या दृष्टीने त्यात मदत झाली आहे.

## काही नकारात्मक प्रवृत्ती

काही नकारात्मक प्रवृत्तीदेखील यामध्ये शिरल्या आहेत. त्यामध्ये दिखाऊपणा आला आहे. लाखोंचा खर्च या उत्सवासाठी केला जातो. गणेशाच्या भव्य मूर्ती आणल्या जातात. भव्य मूर्ती त्याचबरोबर फटाके, मोठी रोषणाई, यामध्ये अवाजवी खर्च केला जातो, प्रदूषण वाढते. पीओपीसारख्या मूर्ती रासायनिक रंग, डीजेचा प्रचंड आवाज, पाण्याचे प्रदूषण यामुळे सामाजिक पर्यावरणाची मोठी हानी होत आहे. यामध्ये राजकीय हस्तक्षेप वाढला आहे. त्यात अनुदान वाटप, मंडळातील वाद व गुंडगिरी हे प्रकार वाढू लागले आहेत. आर्थिक ओझे लोकांच्या मनावर वाढू लागले आहे. त्यामध्ये देणगीची सक्ती केली जाते. नागरिकांवर आर्थिक भार टाकला जातो. सांस्कृतिक मूल्यांची हानी होते. भक्ती भाव कमी झाला आहे, दिखाऊपणा वाढला आहे.

## पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची चळवळ

गेल्या दोन दशकात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची चळवळ आता जोर धरू लागली आहे. शाडू मातीच्या मूर्ती नैसर्गिक व जलद विरघळणाऱ्या कृत्रिम तलाव स्वच्छ ठेवण्यासाठी नैसर्गिक साधजावत फुले, बांबू, कागद, कापड यांचा वापर होऊ लागला आहे. घरी मर्या त्याचे बंधन येऊ लागले आहे. न्यायालयाने ठरवलेल्या मर्यादित साऊंड सिस्टिम वापरावी लागते. प्लास्टिक बंदी सजावटीत प्लास्टिकऐवजी पर्यावरणपूरक साहित्याचा वापर होऊ लागला आहे. शाळा महाविद्यालय स्वयंसेवी संस्था काही नामाची मंडळी या उपक्रमात आघाडी घेत आहेत.

## निष्कर्ष

गणेशोत्सवाचा प्रवास हा भारतीय समाजाच्या बदलत्या प्रवासाशी निगडित आहे. पेशव्यांच्या दरबारी उत्सवापासून टिळकांच्या राष्ट्रीय चळवळीतील माध्यमातून स्वातंत्र्यानंतरच्या समाज जागृतीपासून आजच्या व्यापारी व तांत्रिक स्वरूपापर्यंतचा हा उत्सव बदलत राहिला आहे; मात्र या बदलामध्ये उत्सवाचे मूळ तत्त्व, भक्ती भाव, एकात्मता, मंगलमय वातावरण विसरले जाऊ नये. भविष्यात गणेशोत्सव आणि पर्यावरणपूरकता मूल्याधिष्ठित उपक्रम आणि सामाजिक एकात्मता यांचा निराभ साधने आवश्यक आहे, तरच हा उत्सव खऱ्या अर्थाने विघ्नहर्ता आणि मंगलमय ठरेल.